<u>नि.फौ.ख.क्रं. ७५/२०२२</u> <u>निशाणी क्र. १४</u>
<u>शासन .वि. निलेश कावळे व इतर</u>

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०४ ची शपथेवर जबानी**

.......

**माझे नांव** – राजु विठोबाजी पिठाले
**वय** – ५४ वर्षे, धंदा – शेती,
**राहणार** – दहेगांव, तालुका सेलू व जि. वर्धा.

.......

**<u>सरतपासणी – अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये मॅडम यांच्यामार्फत</u>**

**१.** पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी कुठेही बोलविले नव्हते. माझ्या समक्ष पंचनामा करण्यात आलेला नाही. पोलीसांनी घटनास्थळावर माझ्या समक्ष काहीही जप्त केले नाही. माझी रस्त्यावरुन जात असतांना एका कागदावर सही घेण्यात आली. मी ती न वाचता सही केली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूराबाबत मला माहित नाही. सहीला **<u>निशाणी क्र.१५</u>** देण्यात येते. पोलीसांनी मला दि.१२/११/२०२१ रोजी जप्ती पंचनामा करण्याकरिता बोलविले नव्हते. माझ्या समक्ष पोलीसांनी काहीही जप्त केले नाही. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूराबाबत मला माहित नाही. सहीला **<u>निशाणी क्र.१६</u>** देण्यात येते.

**<u>सरतपास संपला</u>**

**<u>साक्षीदार हा अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्यामुळे सदर साक्षीदारास अभियोगपक्षाने उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली–</u>**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दि.१२/११/२०२१ रोजी मला पोलीसांनी पंचनामा करण्यासाठी मौजा दहेगाव गोसावी, जुनोना रोड येथील शेतशिवार येथे बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळावरुन एक विट जिची लांबी १७

सें.मी आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीने माझ्या समक्ष पोलीसांना घटनास्थळ दाखविले. हे म्हणणे खरे नाही की, दि.१२/११/२०२१ रोजी पोलीसांनी माझ्या समक्ष फिर्यादी यांचे कडुन रक्ताने माकलेले कपडे जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समोर पंचनामा तयार करण्यात आला व मी त्यावर वाचुन व समजून सही केली. मी आरोपीला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी आरोपीला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास : आरोपीतर्फे विधीज्ञ एम.पी.उरकांदे यांनी उलटतपास नाकारला.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI

Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2025.11.03 16:45:42 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**दिनांक** : ०३/११/२०२५